जिल्हा व सत्र न्यायालय, सातारा

५१५, सदरबझार, सातारा,ता. जि. सातारा

दुरध्वनी क्रमांक ०२१६२- २२७०१६ / २९५०४६ ई-मेल -mahsatdc@mhstate.nic.in

जावक क्रमांक/प्रशा./निविदा/ ६३९ /२०२४ **दिनांक : १९/०१/२०२४**

नि वि दा

जिल्हा व सत्र न्यायालय, सातारा या न्यायालयातील झेरॉक्स/नकलेचे काम बाहययंत्रणेव्दारे (Outsourcing) करून घेणेसाठी सेवा पुरवठादार यांचेकडून निविदा मागविणेत येत आहेत.

अटी व शर्ती :—

1. ए—४, लिगल साईज, फुलस्केप व ए—३ अशा चारही आकाराच्या कागदांच्या प्रत्येक प्रतींसाठीचा दर नमुद करणे आवश्यक आहे. झेरॉक्सच्या प्रती या सुवाच्च व स्पष्ट असणे आवश्यक आहे.
2. झेरॉक्स मशिन सेवापुरवठादार यांनी स्वखर्चाने स्थापित करणेची आहे.
3. सदर झेरॉक्स मशिनची देखभाल व दुरूस्ती तसेच कागद, विद्युत देयक व ऑपरेटर या बाबींचा खर्च सेवा पुरवठादार यांनी करणेचा आहे.
4. सेवा पुरवठादार यांनी विनाशर्त रक्कम रूपये ५०००/— चे (Bank Guaranttee Bond) बँक हमी बंधपत्र सादर करणे आवश्यक आहे.
5. सेवा पुरवठादार यांनी सदरील झेरॉक्स मशिनमुळे भोवतालच्या जागेमध्ये नुकसान/तेथे उपस्थित लोकांना संभाव्य इजा/दुखापत इत्यादी या दृष्टीने विमा पॉलिसी उतरविणे आवश्यक आहे.

सेवा पुरवठादार यांचेसोबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील वेळोवेळी निर्देशान्वये प्राप्त झालेल्या अटी व शर्तीना अधीन राहून सेवा करार करणेत येईल. सदरील करार हा अंमलात आलेच्या तारखेपासून पुढील एक वर्षासाठी अस्तित्वात राहील.

संबंधीत निविदादारांनी त्यांच्या निविदा सिलबंद लखोटयामध्ये जिल्हा व सत्र न्यायालय, सातारा या कार्यालयात दिनांक २९/०१/२०२३ रोजी अगर त्यापुर्वी सादर

करण्यात याव्यात. सदर सिलबंदलखोटयावर **''<u>जिल्हा व सत्र न्यायालय सातारा येथील झेरॉक्सचे काम बाहययंत्रणव्दारे करणेसाठी निविदा.</u>''**असा स्पष्ट उल्लेख करावा. मुदत संपलेनंतरप्राप्त झालेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी. निविदा स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे पुर्ण अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो. सातारा यांना राहतील. तसेच प्राप्त झालेल्या निविदांमधील दर वाजवी/ रास्त नसल्यास संबंधीत निविदा नाकारण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत.

निविदा उघडल्यानंतर आवश्यकता वाटल्यास, निविदादार यांना जिल्हा न्यायालय सातारा या कार्यालयात उपस्थित रहावे लागेल. यासाठी निविदादार यांनी **लखोटयावर त्यांच्या फर्मचे पुर्ण नाव व पत्ता आणि दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.**

निविदादार यांचे कोणत्याही न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी प्रकरण प्रलंबीत नसल्याबाबत तसेच कोणत्याही न्यायालयाने त्यांना/ त्यांचे फर्मला दोषी सिध्द केले नसल्याबाबतचे हमीपत्र निविदेसोबतसादर करणे आवश्यक आहे.

हुकूमावरुन,

19/01/2014

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, सातारा

प्रत :—

१. सहाय्यक अधिक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, सातारा यांचेकडे जिल्हा न्यायालय, दिवाणी न्यायालय व. स्तर, मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, जिल्हा विधीज्ञ संघ, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.
ज्यादा प्रत — बेलिफ दि.न्या. व. स्तर, सातारा यांचेमार्फत मुख्यालय इमारतीच्या परिसरातील सर्व शासकिय कार्यालयांच्या नोटीसबोर्डावर प्रसिध्दीसाठी.

२. संगणक विभाग यांचेकडे जिल्हा न्यायालय, साताराच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.